# महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे 30.

# संकलित मूल्यमापन 2 : 2017-18

## शिक्षक सूचना पुस्तिका

## विषय – सामान्य विज्ञान

## इयत्ता – सहावी ते आठवी

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | इयत्ता | सूचना | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1) | इ. सहावी ते इ. आठवी | लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना | 3 |
| 2) | इ. सहावी ते इ. आठवी | तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना | 4 व 5 |
| 3) | इ. सहावी ते इ. आठवी | प्रात्यक्षिक प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना | 5 ते 7 |

# संकलित मूल्यमापन 2 : 2017-18
## विषय : सामान्य विज्ञान
## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**सर्वसाधारण सूचना : इयत्ता सहावी ते आठवी करिता.**

1) उत्तरसूचीमध्ये दिल्याप्रमाणे अचूक उत्तरे विद्यार्थ्यांनी नोंदविल्यास पूर्ण गुणदान करावे.

2) इयत्ता सहावी प्रश्न क्रमांक 1 ते 4 मधील उपप्रश्न क्रमांक 'इ' ते 'ग' या उपप्रश्नांसाठी सूचनेप्रमाणे एक प्रतिसाद/मुद्दा/बाब नोंदविल्यास 1 गुण द्यावा. दोन प्रतिसाद/मुद्दे/बाबी नोंदविल्यास 2 गुण द्यावेत.

3) इयत्ता सातवी उपप्रश्न क्रमांक 'इ' ते 'ग' व आठवी प्रश्न क्रमांक 1 ते 5 मधील उपप्रश्न क्रमांक 'ग' ते 'ह' या उपप्रश्नांसाठी सूचनेप्रमाणे एक प्रतिसाद/मुद्दा/बाब नोंदविल्यास 1 गुण द्यावा. दोन प्रतिसाद/मुद्दे/बाबी नोंदविल्यास 2 गुण द्यावेत.

### इयत्ता – सहावी

1) प्रश्न क्रमांक **1** ते **4** मध्ये **'अ'** ते **'ग'** असे **सात** उपप्रश्न आहेत.

2) प्रश्न क्रमांक **1** ते **4** मध्ये **'अ'** ते **'ड'** हे **चार** उपप्रश्न प्रत्येकी **1** गुणाचे आहेत.

3) प्रश्न क्रमांक **1** ते **4** मध्ये **'इ'** ते **'ग'** हे **तीन** उपप्रश्न प्रत्येकी **2** गुणांचे आहेत.

### इयत्ता – सातवी

1) प्रश्न क्रमांक **1** ते **5** मध्ये **'अ'** ते **'ग'** असे **सात** उपप्रश्न आहेत.

2) प्रश्न क्रमांक **1** ते **5** मध्ये **'अ'** ते **'ड'** हे **चार** उपप्रश्न प्रत्येकी **1** गुणाचे आहेत.

3) प्रश्न क्रमांक **1** ते **5** मध्ये **'इ'** ते **'ग'** हे **तीन** उपप्रश्न प्रत्येकी **2** गुणांचे आहेत.

### इयत्ता – आठवी

1) प्रश्न क्रमांक **1** ते **5** मध्ये **'अ'** ते **'ह'** असे **आठ** उपप्रश्न आहेत.

2) प्रश्न क्रमांक **1** ते **5** मध्ये **'अ'** ते **'फ'** हे **सहा** उपप्रश्न प्रत्येकी **1** गुणाचे आहेत.

3) प्रश्न क्रमांक **1** ते **5** मध्ये **'ग'** व **'ह'** हे **दोन** उपप्रश्न प्रत्येकी **2** गुणांचे आहेत.

4) प्रश्न क्रमांक **3** मधील उपप्रश्न क्रमांक **'ग'** यासाठी कोणतेही दोन अचूक चिन्ह वापरून विद्युत परिपथ काढल्यास प्रत्येकी **1** गुण द्यावा.

5) प्रश्न क्रमांक **5** मधील उपप्रश्न क्रमांक **'ह'** यासाठी अचूक आकृती काढल्यास **1** गुण आणि आकृतीच्या कोणत्याही एका भागास नाव दिल्यास **1** गुण द्यावा.

## तोंडी प्रश्न

### सर्वसाधारण सूचना : इयत्ता सहावी ते आठवी करिता.

**सूचना :** 1) विद्यार्थ्यांनी तोंडी प्रश्नांची उत्तरे मनातल्या मनात विचार करून लिहावयाची आहेत.

2) खालील प्रश्न विचारण्यापूर्वी लेखी चाचणी विद्यार्थ्यांना वितरित करावी. त्यानंतर सर्व वर्गाला उद्देशून तोंडी प्रश्न विचारावे आणि O 1 ते O 5 या क्रमांकावर विद्यार्थ्यांना योग्य प्रतिसाद लेखी स्वरूपात नोंदविण्यास सांगावे.

### इयत्ता – सहावी — गुण – 5

O 1 : गुरूत्वाकर्षण बलाचा शोध कोणी लावला?
**सर आयझॅक न्यूटन.**

O 2 : एस. आय. एकक पद्धतीत कार्य आणि ऊर्जा कोणत्या एककात मोजतात?
**ज्युल.**

O 3 : ध्वनीच्या निर्मितीसाठी कशाची आवश्यकता असते?
**कंपनांची.**

O 4 : सर्वांत मोठी सूर्यतबकडी कोठे आहे?
**जंतर–मंतर (नवी दिल्ली)**

O 5 : महाराष्ट्रातील अशनी आघाताने तयार झालेले सरोवर कोणते?
**लोणार सरोवर.**

### इयत्ता – सातवी — गुण – 5

O 1 : जंगल संवर्धन कसे करशील? ते लिही.
**वृक्षारोपण करेन. कमी वय असलेली झाडे तोडणार नाही.**

O 2 : शून्यछाया दिन म्हणजे काय? ते लिही.
**ज्या दिवशी सूर्य बरोबर माथ्यावर येतो, त्या दिवसाला शून्यछाया दिन म्हणतात.**

O 3 : ध्वनींची पातळी कोणत्या एककात मोजतात? ते लिही.
**डेसीबल**

O 4 : एका चुंबकीय संमिश्राचे नाव लिही.
**अल्निको**

O 5 : क्षरण कोणत्या घटकांमुळे होते? ते लिही.
**हवेतील ऑक्सिजन, आर्द्रता, रसायनांची वाफ.**

## इयत्ता – आठवी गुण – 5

O 1 : मिथेनचे रेणूसूत्र लिही.

**$CH_4$**

O 2 : समुद्रात आढळणाऱ्या कोणत्या प्राण्यापासून मोती मिळतात?

**ऑयस्टर**

O 3 : बर्फाचा द्रवणांक किती आहे?

**बर्फाचा द्रवणांक ०° से. आहे.**

O 4 : शीतपेयाच्या बाटलीचे झाकण उघडले असता, कोणता वायू फसफसून बाहेर येतो?

**कार्बन डायऑक्साईड**

O 5 : आगपेटी, फटाके तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अधातूचे नाव लिही.

**तांबडा फॉस्फरस**

---

## प्रात्यक्षिकासाठी गुण निकष

**सर्वसाधारण सूचना : इयत्ता सहावी ते आठवी करिता. गुण – 5**

**प्रात्यक्षिकासाठी दिलेल्या प्रयोग यादीचे वाचन करून त्यासाठी आवश्यक असणारे साहित्य पुरेशा प्रमाणात प्रात्यक्षिक घेण्यापूर्वी उपलब्ध करून ठेवावे. साहित्याचा वापर करूनच प्रात्यक्षिक घ्यावे.**

प्रात्यक्षिकासाठी खाली प्रयोगाची यादी दिलेली आहे. त्यापैकी प्रत्येक विद्यार्थ्याकरिता कोणत्याही एका प्रयोगाची निवड करावी. विद्यार्थ्याकडून प्रात्यक्षिक करून घ्यावे.

खाली दिलेल्या निकषाप्रमाणे गुणदान करावे. काही प्रात्यक्षिकाच्या गुणदानामध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करावा.

1) साहित्याची ओळख आहे. गुण 1

2) साहित्याद्‌वारे मांडणी/रचना केली आहे. गुण 1

3) प्रयोगासाठी योग्य कार्यपद्‌धतीचा अवलंब केला आहे. गुण 1

4) निरीक्षणाची नोंद केली आहे. गुण 1

5) अनुमान/निष्कर्ष काढला आहे. गुण 1

## इयत्ता – सहावी : प्रयोगाकरिता यादी

| | |
|---|---|
| P 1) | चुंबकातील आकर्षण व प्रतिकर्षण गुणधर्म अभ्यासणे.<br>साहित्य : चुंबक-2, दोरा, स्टँड.<br>अनुमान : चुंबकाच्या सजातीय ध्रुवांमध्ये प्रतिकर्षण, तर विजातिय ध्रुवांमध्ये आकर्षण असते. |
| P 2) | तरफेचे बल, भार, टेकू यांच्या स्थानावरून होणारे प्रकार तपासणे.<br>साहित्य : 1. मोजपट्टी, पेन्सील, दगड 2. अडकित्ता 3. चिमटा.<br>अनुमान : बल, टेकू आणि भार यांच्या स्थानांवर तरफेचे तीन प्रकार पडतात. |
| P 3) | वरच्या दिशेने वजन उचलण्यासाठी खालच्या दिशेने बल लावता येते हे कप्पीच्या सहाय्याने तपासणे.<br>साहित्य : दोऱ्याचे रिकामे रिळ/कप्पी, पेन्सिल, चिकटपट्टी, दोरा, वजन/दगड. |
| P 4) | ध्वनीचे प्रसारण वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळ्या वेगाने होते, हे तपासणे.<br>साहित्य : पाणी, पिचकारी, दोन फुगे (पाणी भरलेला, हवा भरलेला). |
| P 5) | प्रकाशाच्या संक्रमणाचा अभ्यास करणे.<br>साहित्य : मेणबत्ती, दाभण, तीन समान आकाराचे पुठ्ठे.<br>अनुमान : प्रकाशाच्या सरळ दिशेतील प्रवासाला प्रकाशाचे रेषीय संक्रमण असे म्हणतात. |

## इयत्ता – सातवी : प्रयोगाकरिता यादी

| | |
|---|---|
| P 1) | अपमार्जकाची क्रिया अजमावणे.<br>साहित्य : काचेची बाटली, पाणी, तेल, अपमार्जकाचे द्रावण.<br>अनुमान : अपमार्जके वापरल्याने मिश्रणाचा रंग ................................... |
| P 2) | प्रकाशाच्या विकिरणाचा अभ्यास करणे.<br>साहित्य : चंचूपात्र, पाणी, दूध, चमचा, लेझर.<br>अनुमान : पाण्यात तरंगणाऱ्या दुधाच्या ..................... |
| P 3) | रंजकद्रव्य पृथक्करण पद्धत अभ्यासणे.<br>साहित्य : चंचूपात्र, गाळण कागद, शाई, खडू.<br>अनुमान : रंजकद्रव्य पृथक्करणात पदार्थाचा गुणधर्म ................. |
| P 4) | चुंबकीय क्षेत्राची वेधन क्षमता अजमावणे.<br>साहित्य : टाचण्या, लोहचुंबक, प्लास्टिकची बाटली, भांडे, पाणी, पुठ्ठा इ.<br>अनुमान : चुंबकीय क्षेत्र तीव्रता ................. |
| P 5) | बिंदुस्रोतामुळे मिळणारी छाया अभ्यासणे.<br>साहित्य : मेणबत्ती, पुठ्ठा, चेंडू (लहान व मोठा).<br>अनुमान : बिंदुस्रोतामुळे मिळालेल्या छाया ................. |

## इयत्ता – आठवी : प्रयोगाकरिता यादी

| | |
|---|---|
| P 1) | विद्युत घट, बल्ब, कळ आणि तार यांची ओळख करून चिन्हे अभ्यासणे.<br>साहित्य : विद्युत घट, बल्ब, कळ आणि तार इ.<br>निरीक्षण : ............................................. |
| P 2) | कोरडा विद्युतघटाची रचना अभ्यासणे.<br>साहित्य : एक निकामी झालेला विद्युतघट.<br>निरीक्षण : ............................................. |
| P 3) | धातू हे ऑक्सिजनशी संयोग पावतात, हे मॅग्नेशियमची फीत जाळून पाहणे.<br>साहित्य : मॅग्नेशियमची फीत, स्पिरीटचा दिवा, चिमटा इ.<br>निरीक्षण : .............................................<br>अनुमान : ............................................. |
| P 4) | मातीच्या प्रकारानुसार तिच्या कणांचा आकार आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता अभ्यासणे.<br>साहित्य : काळीमाती, लालमाती, वाळू इ.<br>निरीक्षण : ............................................. |
| P 5) | मीठाच्या द्रावणापासून मीठ आणि पाणी उर्ध्वपातन क्रियेने वेगळे करणे.<br>साहित्य : मिठाचे द्रावण, चंबू, संघननी, चंचूपात्र, तापमापी, बर्नर (स्पिरीटचा दिवा) इ.<br>निरीक्षण : ............................................. |
| P 6) | धातू व अधातूचे भौतिक गुणधर्म अभ्यासणे.<br>साहित्य : तांब्याची तार, नाणे, कोळसा, पेन्सिल इ.<br>निरीक्षण : ............................................. |

**सरल प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांचे लेखी परीक्षेतील इयत्ता 6 वी चे प्रश्न क्र. 1 ते 4 आणि इयत्ता 7 वी व 8 वी करिता प्रश्न क्र. 1 ते 5 चे गुण आणि प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण स्वतंत्रपणे नोंदविणे आवश्यक आहे.**

■■■